**महानगरपालिका व नगरपरिषद/नगरपंचायत निवडणुकांसाठी मतदार यादी व मतदान केंद्र निश्चितीबाबत निकष...**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र. ४/का.५,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
दिनांक :- ०७/०१/२०१५

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

**विषय :- मतदार यादी व मतदान केंद्र निश्चितीबाबत निकष...**

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक ३० जुलै, २०११ च्या पत्रासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये मतदान केंद्रांच्या निश्चितीबाबत निकष विहित करण्यात आले आहेत. सदर निकषांमधील निकष क्रमांक-१ ऐवजी पुढील निकष समाविष्ट करण्यात येत आहेत.

(१-अ) महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकांकरिता प्रत्येक मतदान केंद्रावर १२०० ते १४०० मतदार जोडण्यात यावेत.

(१-ब) लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये मतदारांना बी.एल.ओ.मार्फत फोटो असलेली व्होटर स्लीप वाटण्यात आली होती. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये व्होटर स्लीपचे वाटप करावे.

(१-क) लोकसभा व विधानसभा निवडणुकांकरिता मतदाराचे नाव ज्या मतदान केंद्रांवर होते त्याच मतदान केंद्रावर शक्यतोवर (मतदान केंद्राची इमारत) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता त्याचे नाव ठेवण्यात यावे.

(१-ड) मतदान केंद्रावरील सोयी-सुविधा इत्यादी सर्व लोकसभा व विधानसभा निवडणुकीप्रमाणे असतील याची खबरदारी घेण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

D:\Corpn २०१४-१५\Election २०१४-१५.docx